महाराष्ट्र शासन

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

# Government Medical College, Jalgaon

Jilhapeth, Govt. Hospital Campus, Jalgaon - 425001, M.S. (INDIA)

Telephone & Fax No. 0257- 2232390 Email- deangmcjalgaon@gmail.com

जा.क्र.शावैमज/नवीन परिचर्या महाविद्यालय/जाहिरात/वसतीगृह/ 2578 /२०२५, दि.14/०७/२०२५

प्रति,
मा.जिल्हा माहिती अधिकारी,
जिल्हामाहिती कार्यालय,
जळगांव.

विषय :-शासकीय परिचर्या महाविद्यालय (बी.एस.सी. नर्सिंग) जळगाव या संस्थेसाठी महाविद्यालय व वसतिगृहासाठी खाजगी इमारत कराराने भाडेतत्वावर मिळण्यासाठी जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणे बाबत...

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, शासकीय परिचर्या महाविद्यालय, जळगांव या संस्थेच्या महाविद्यालयासाठी व विद्यार्थ्यांच्या वसतीगृहासाठी खाजगी इमारत कराराने भाडेतत्वावर घ्यावयाचे असल्यामुळे जाहिरात वृत्तपत्रात प्रसिध्द करणेकामी माहिती या सोबत जोडुन पाठविण्यात येत आहे. तथापी स्थानिक जिल्हातंर्गत वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करण्याबाबतची कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती.

| | | |
|---|---|---|
| १. | जाहिरात प्रसिध्दीस देणा-या अधिका-याचा हुददा | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव. |
| | पत्ता | जिल्हापेठ, जळगांव-४२५ ००१. |
| | दुरध्वनी क्रमांक | ०२५७-२२२२९१७ |
| २. | प्रसिध्दीची स्वरुप | जिल्हास्तरावर |
| ३. | जाहीरात कोणत्या तारखेपुर्वी प्रसिध्द करावी. | दि. १७/०७/२०२५ |
| ४. | जाहिरात वृत्तपत्रातुन प्रसिध्द कशी करावी. | जिल्हा स्तरावरील जास्त खप असलेल्या प्रसिध्द एका मराठी दैनिकातुन फक्त एकदाच |
| ५. | जाहीरात किती वृत्तपत्रातुन व किती वेळा प्रसिध्द करावयाची आहे. | जिल्हा स्तरावरील जास्त खप असलेल्या प्रसिध्द एका मराठी दैनिकातुन फक्त एकदाच . |
| ६. | जाहिरातीचे देयक कोणत्या कार्यालयाचे नावे पाठवावे. | अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव. |

(डॉ. गिरीष ठाकूर)
अधिष्ठाता,
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगांव

प्रत:- मा.आयुक्त, संचालनालय, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई-४०० ००१ यांना माहितीस्तव सादर.

Scanned with OKEN Scanner

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

जिल्हा पेठ,जिल्हा सामान्य रुग्णालय आवार,जळगांव

# जाहिरात

दि.     /०७/२५

शासकीय परिचर्या महाविद्यालय (**बी.एस.सी. नर्सिंग) हा अभ्यासक्रम जळगाव येथे सुरु करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यासाठी १०० विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी महाविद्यालय व** विद्यार्थ्यांकरिता (मुले व मुली) यांना राहण्यासाठी विद्युत, पाणी व वाहनाकरीता पार्किंगची व्यवस्था इत्यादि. सर्व सोई उपलब्ध असलेल्या तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांनी निर्धारित केलेल्या भाडयाप्रमाणे ११ महिने व आवश्यक असल्यास वाढीव कालावधी करिता करारतत्वावर इमारत भाडयाने घेणे आहे..

उक्त नमुद केल्या प्रमाणे नियमावलीत असलेल्या व भाडेतत्वावर देण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांसह (जागेचा उतारा, कामपूर्णत्वाचा दाखला, मंजूर प्लॅन, इमारतीचे फोटो, विद्युत देयकाची प्रत इत्यादी) या कार्यालयामध्ये दि.30/05/2025 रोजी पर्यंत सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सादर करावा. सदरील भाडेतत्वावरील इमारत उपलब्ध करुन देण्यासंबंधी अटी व शर्ती इ.बाबतची सविस्तर माहिती खालील प्रमाणे :- **अटी व शर्ती**

- सदरील इमारती मध्ये नियमित पुरेशा प्रमाणात शुध्द पिण्याचे व वापराण्याचे पाणी असावे.
- विद्युत पुरवठाची पूर्ण व्यवस्था असावी.
- इमारतीच्या समोर पार्किंगसाठी पुरेशी जागा असावी.
- इमारत शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जिल्हा पेठ, जळगांव पासुन शक्य तितक्या जवळ असावी.
- इमारत ११ महिने व त्यानंतर आवश्यक असल्यास वाढीव कालावधीकरिता कराराने भाडेतत्वावर घेण्यात येईल.
- पाणीपटटी, घरपटटी व इतर अनुषंगीक कर भरण्याची जबाबदारी हि इमारत मालकाची राहिल.
- इमारत ताब्यात घेतल्याच्या दिनांकपासून ताब्यात असलेल्या खोल्यामधील विद्युत वापराच्या देयकाची भरणा या संस्थेकडून करण्यात येईल.
- इमारतीचे बांधकाम १५ वर्षापुर्वीचे नसावे.
- वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने इमारत पुर्णता सुरक्षित, संरचानात्मक परिक्षण व अग्नि प्रतिबंधक उपाययोजना केलेली असावी.
- इमारतीचे भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाने निर्धारित/निश्चित केल्याप्रमाणे शासकीय नियमानुसार अदा करण्यात येईल.
- इमारतीमध्ये किमान १०० विद्यार्थ्यी क्षमता असणे आवश्यक आहे.
- इमारतीमध्ये लहान व मोठी दुरुस्तीचे कामे तसेच नुतनीकरण करण्याची जबाबदारी इमारत मालकाची राहिल व त्याकरिताचा खर्च इमारत मालकास स्वतः करावा लागेल व त्याची प्रतिपूर्ती या कार्यालयाकडून होणार नाही
- इमारतीचे भाडे शासनाकडून निधी उपलब्ध झाल्यानंतरच इमारत मालकास अदा करण्यात येईल.
- संस्थास्तरावर गठित केलेल्या समितीद्वारे इमारतीची संपूर्ण पाहणी करुन समितीच्या अहवालानुसार इमारत भाडयाने घेण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

- **इमारत भाडयाने घेण्या संबंधीचे आदेश निर्गमित करण्याचे अथवा प्रलंबित ठेवण्याचे अथवा कोणत्याही वेळी आदेश रद्य करण्याचे तसेच जाहिरात रद्य करण्याचे अधिकार अधिष्ठाता यांनी स्वत:कडे राखुन ठेवलेले आहे**

(डॉ. गिरीष ठाकूर)
**अधिष्ठाता**
**शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगाव**

Scanned with OKEN Scanner

प्रेस नोट

# शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव

## जाहिरात

शासकीय परिचर्या महाविद्यालय (बी.एस.सी. नर्सिंग) हा अभ्यासक्रम जळगाव येथे सुरु करण्यास शासनाची मान्यता प्राप्त झाली आहे. त्यासाठी १०० विद्यार्थ्यांच्या अध्यापनासाठी महाविद्यालय व विद्यार्थ्यांकरिता (मुले व मुली) यांना राहण्यासाठी विद्युत, पाणी व वाहनाकरीता पार्किंगची व्यवस्था इत्यादि. सर्व सोई उपलब्ध असलेल्या तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग, जळगांव यांनी निर्धारित केलेल्या भाडयाप्रमाणे ११ महिने व आवश्यक असल्यास वाढीव कालावधी करिता करारतत्वावर इमारत भाडयाने घेणे आहे.

उक्त नमुद केल्या प्रमाणे नियमावलीत असलेल्या व भाडेतत्वावर देण्यास इच्छुक असलेल्या इमारत मालकांनी अर्ज व आवश्यक त्या कागदपत्रांसह (जागेचा उतारा, कामपूर्णत्वाचा दाखला, मंजूर प्लॅन, इमारतीचे फोटो, विद्युत देयकाची प्रत इत्यादी) या कार्यालयामध्ये दि.३०/०७/२०२५ रोजी पर्यंत सायंकाळी ०६.०० वाजेपर्यंत सादर करावा.

सदरिल सविस्तर जाहिरात संस्थेचे संकेतस्थळ www.gmcjalgaon.org वर उपलब्ध आहे.

स्वा/-
(डॉ. गिरीष ठाकूर)
अधिष्ठाता
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,
जळगांव

Scanned with OKEN Scanner